Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA**
PHONE : EPABX – 2609000 PGBUTR- 0231 2609296/9139,
www.unishivaji.ac.in, pgbutr@gmail.com
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४,
महाराष्ट्र
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९००० दूरध्वनी पी. जी. बी. यु. टी. आर. - ०२३१ २६०९२९६/९१३९,
www.unishivaji.aic.in, pgbutr@gmail.com

संदर्भ क्र.शिवाजी विद्यापीठ/पीजीबीयुटीआर/पीएच.डी/9640 दि 30 SEP 2026

प्रति,

१. सर्व अधिविभाग प्रमुख/संचालक/समन्वयक,
पदव्युत्तर अधिविभाग/पदव्युत्तर अभ्यासक्रम,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर दिनांक

२. सर्व प्राचार्य/संचालक,
सलंग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय– साध्या बांधणीतील शोधप्रबंध (Spiral Thesis) व अंतिम शोधप्रबंध (Final Thesis) सादर करत असताना पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांनी करावयाच्या पूर्ततेबाबत

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयसंदर्भात आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, पीएच.डी अभ्यासक्रमास प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांनी साध्या बांधणीतील शोधप्रबंध **(Spiral Thesis)** व अंतिम शोधप्रबंध **(Final Thesis)** सादर करत असताना आवश्यक बाबींची पूर्तता न केल्याने, पीएच.डी. निकाल जाहीर करताना त्रुटी दिसून येत आहेत. त्यामुळे त्रुटी पूर्तता करुन घेऊनच निकाल जाहीर करण्यात येत आहेत. तेव्हा पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांनी स्पायरल थेसीस व फायनल थेसीस सादर करत असताना खालील आवश्यक बाबीची व कागदपत्रांची पूर्तता करुनच स्पायरल/फायनल थेसीस सादर करणे बंधनकारक आहे.

**पी.जी.बीयुटीआर संगणक प्रणालीमध्ये व प्रत्यक्ष सादर करण्यात येणारी कागदपत्रे–**

1. RPE कोर्स, पीएच.डी कोर्सवर्क तसेच सन २०२५–२०२६ पासून प्रवेशित विद्यार्थ्यांनी Teacher Training Programme/Course पूर्ण केल्याबाबत सर्व आवश्यक बाबी पीजीबीयुटीआर संगणक प्रणालीमध्ये अपलोड करणे आवश्यक आहे.
2. संशोधक विद्यार्थ्याने, संशोधन सल्लागार समितीने मंजूर केलेला सिनॉपसीस विद्यार्थी व मार्गदर्शक यांचे स्वाक्षरीसह संगणक प्रणालीमध्ये अपलोड करणे आवश्यक आहे.
3. नावनोंदणी दिनांकापासून स्पायरल थेसीस सादर करेपर्यंत, संशोधन सल्लागार समितीने मंजूर/Scrutiny केलेले Satisfactory/Non-Satisfactory remarks असणारे सर्व प्रोग्रेस रिपोर्ट (स्वाक्षरीसह) संगणक प्रणालीमध्ये अपलोड करणे आवश्यक आहे.
4. शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पूर्वी पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी नावनोंदणी दिनांकापासून साध्या बांधणीतील शोधप्रबंध सादरीकरणापर्यंतच्या कालावधीतील सर्व वर्षाचे विहित मुदतीत वार्षिक शुल्क भरलेल्या (विहित मुदतीनंतर दंडासह) शुल्काच्या पावत्या (Receipt) संगणक प्रणालीमध्ये अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच, फी पावत्या संगणक प्रणालीमध्ये अपलोड होत नसतील तर त्याच्या प्रती संबधीत विद्यार्थ्याने पीजीबीयुटीआर विभागास सादर करणे आवश्यक आहे. शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांनी ज्या–त्या वर्षाचे वार्षिक शुल्क विहित मुदतीत स्टुडंट लॉगिन मधून Payment Gateway द्वारे भरणे आवश्यक आहे.
5. रिसर्च पब्लिकेशन्स व कॉन्फरन्स/सेमिनार मध्ये विद्यार्थ्याने केलेले पेपर प्रेझेंटेशन, सर्टिफिकेट संशोधन मार्गदर्शक यांच्या स्वाक्षरीसह संगणक प्रणालीमध्ये अपलोड करावेत. तसेच कॉन्फरन्स/सेमिनार प्रमाणपत्रावर, पेपर प्रेझेंटेशनची नोंद असणे आवश्यक आहे.
6. पीएच.डी. अभ्यासक्रमास नावनोदंणी दिनांकापासून अडीच वर्ष ते सहा वर्ष कालावधीमध्ये सध्या बांधणीतील शोधप्रबंध (स्पायरल थेसीस) सादर करणे आवश्यक आहे. सहा वर्षापूढील कालावधीकरिता पुढील संशोधनासाठी विहित शुल्क भरुन मुदतवाढ घेणे अनिवार्य आहे.
7. शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांनी सध्या बांधणीतील शोधप्रबंध (स्पायरल थेसीस) अडीच वर्षानंतर व अंतिम शोधप्रबंध (फायनल थेसीस) (स्वाक्षरीसह) तीन

वर्षानंतर संगणक प्रणालीमध्ये अपलोड करता येईल. शैक्षणिक वर्ष २०२४–२५ व त्यापूर्वी पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांना तीन वर्षानंतर सध्या बांधणीतील शोधप्रबंध संगणक प्रणालीमध्ये अपलोड करता येतील.

8. सध्या बांधणीतील शोधप्रबंधाच्या (स्पायरल थेसीस) छाननी (Scrutiny) दिनांकापासून पुढील सहा महिन्यात अंतिम शोधप्रबंध (फायनल थेसीस) पीजीबीयुटीआर विभागास सादर करणे आवश्यक आहे.
9. पीएच.डी. संशोधक विदयार्थ्यांनी अंतिम शोधप्रबंध संबधित विद्यार्थी, मार्गदर्शक आणि अधिविभाग प्रमुख/संचालक यांचे स्वाक्षरीसह संगणक प्रणालीमध्ये अपलोड करणे बंधनकारक आहे.
10. फायनल थेसीस सादर करतेवेळी संशोधन मार्गदर्शक यांचे Specialization Certificate सादर करणे आवश्यक आहे.
11. संशोधक विदयार्थ्यांनी नो–डयुज सर्टिफिकेट, (स्वाक्षरीसह) प्लॅगिरिझम सर्टिफिकेट (स्वाक्षरीसह) संगणक प्रणालीमध्ये अपलोड करणे आवश्यक आहे.
12. मार्गदर्शक बदल, शोधप्रबंधाचे शिर्षक बदल, संशोधनाकरिता मुदतवाढ मागणी पत्र याबाबतची कार्यवाही करताना संशोधक विद्यार्थ्यांनी संगणक प्रणालीमधून अर्ज करणे आवश्यक आहे.
13. शिवाजी विद्यापीठातून M.Phil/Pre.Ph.D कोर्स पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनी, पीएच.डी. कोर्सवर्क साठी exemption बाबत अर्ज सादर करुन मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच पीएच.डी. कोर्सवर्क करीता 55% गुणांची अट आवश्यक आहे.
14. साध्या बांधणीतील शोधप्रबंध (स्पायरल थेसीस) व अंतिम शोधप्रबंध (फायनल थेसीस) जमा करताना संशोधक विद्यार्थ्याने, संशोधन मार्गदर्शक, प्राचार्य/अधिविभागप्रमुख यांच्या स्वाक्षरीसह covering letter सादर करणे आवश्यक आहे.
15. संशोधन मार्गदर्शक व अधिविभागप्रमुख यांच्या स्वाक्षरीने Pre-Final/ Final Thesis with CD जमा करणे आवश्यक आहे.
16. Pre-Final Thesis जमा करताना आवश्यक ठिकाणी संशोधन मार्गदर्शक यांची स्वाक्षरी व संशोधन केंद्रांचा सही व शिक्का घेणे आवश्यक आहे.
17. संशोधन सल्लागार समितीने Pre-Final Thesis मध्ये त्रुटी सुचविल्यास, त्याची त्रुटीपूर्तता झाल्याबाबत संशोधन मार्गदर्शक व RAC Compliance Report सादर करणे आवश्यक आहे. Pre-Final Thesis Scrutiny Report जमा करणे आवश्यक आहे.
18. पीएच.डी. अंतिम शोधप्रबंधामध्ये Plagiarism तपासणीची मुळ प्रत शोध प्रबंधाच्या सुरवातीस लावावी. तसेच रिसर्च पब्लिकेशनवर संशोधन मार्गदर्शकांची स्वाक्षरी घेऊन Hard Bound Thesis च्या शेवटी लावून बायडिंग करुन सादर करावा.
19. Plagiarism Report १० टक्केच्या आतील व Originality of Research work certificate संगणक प्रणालीमध्ये अपलोड करणे आवश्यक आहे. व त्याच्या झेरॉक्सप्रत Hard Bound Thesis जमा करताना सादर करणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी संगणक प्रणालीमध्ये अपलोड असल्याशिवाय तसेच आवश्यक कागदपत्रे स्पायरल थेसीस व फायनल थेसीस सोबत सादर केल्याशिवाय, संबधित संशोधक विद्यार्थ्यांचे पीएच.डी. स्पायरल थेसीस/ फायनल थेसीस जमा करुन घेण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी. तेव्हा वरील बाबी सर्व पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात.

आपली विश्वासू,

उपकुलसचिव

प्रत:—

१. प्र—कुलगुरु व कुलसचिव कार्यालय यांना माहितीसाठी
२. अधिष्ठता, सर्व विद्याशाखा यांना माहितीसाठी
३. अध्यक्ष, सर्व अभ्यासमंडळे यांना माहितीसाठी
४. संगणक केंद्र यांना माहितीसाठी